प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गंत " उद्योगकेंद्रीत कौशल्य विकास कार्यक्रमास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०१५/प्र.क्र.५८/अभियान-१
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जानेवारी, २०१६.

<u>वाचा</u> : १) केंद्र शासन, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक १५ जुलै, २०१५.
२) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्रमांक कौविउ-२०१५/ प्र.क्र.१२२/ रोस्वरो-१, दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५.
३) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.३७/अभि-१, दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५.

<u>प्रस्तावना :</u>

उत्पादन क्षेत्रातील अभ्यासक्रमांकरीता आवश्यक पायाभूत सुविधा व इतर बाबींसाठी उदा. आधुनिक/अद्ययावत यंत्रसामुग्री त्यांची देखाभाल व दुरूस्ती तसेच सदर अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारीत प्रशिक्षणासाठी तज्ञ प्रशिक्षक या बाबी औद्योगिक आस्थापनांव्यतिरिक्त इतर प्रशिक्षण संस्थांनी प्रशिक्षणाकरीता उपलब्ध करून देणे खर्चिक स्वरूपाचे आहे. त्यामुळे प्रशिक्षणाचा खर्च वाढून त्याचा लाभ कमी लाभार्थ्यांना मिळतो अथवा बहुतांश प्रशिक्षण संस्था अशा प्रकारच्या अभ्यासक्रमांमध्ये भांडवली गुंतवणूक अधिक असल्याने असे खर्चिक अभ्यासक्रम राबविण्यांस इच्छुक नसतात. सबब संबंधित क्षेत्रातील आस्थापनांनी त्यांना लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाच्या निर्मिती करता प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या व त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा तसेच प्रशिक्षक इत्यादीं बाबीं कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी उपलब्ध करून दिल्यास कमी कालावधीत व कमी खर्चामध्ये उच्च दर्जाचे मनुष्यबळ निर्माण करणे शक्य होईल. त्यामाध्यमातून कुशल मनुष्यबळाची मागणी व पुरवठा यांचा समतोल साधला जावून औद्योगिक विकासास चालना मिळेल.

राज्यातील युवक -युवतींचे कौशल्य विकासद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग, सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार /स्वंयरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबविण्यास या विभागाच्या दि. ०२ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे. सदरहू शासन निर्णयामधील कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, परिच्छेद ३.३ मध्ये "उद्योगांसाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी उद्योगसमुहांना प्रशिक्षण संस्था म्हणून सूचिबद्ध करण्यावर विशेष भर देण्यात येईल व उद्योगांना लागणारे मनुष्यबळ त्यांच्याचमार्फत प्रशिक्षित करुन त्यापैकी ७५% मनुष्यबळाला रोजगारावर सामावून घेणे व त्याकरिता सदर औद्योगिक आस्थापना तथा प्रशिक्षण संस्थेसमवेत लवचिक सामंजस्य करार (Flexi MoU) करण्यात येईल" असे नमूद केले आहे.

त्यामुळे शासन निर्णय कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, दिनांक ०३ ऑगस्ट, २०१५ अन्वये मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत उद्योगकेंद्रीत कौशल्य विकास कार्यक्रमास मान्यता देण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

जागतिक स्तरावर वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानानुसार कुशल मनुष्यबळाची निर्मिती करण्याचे प्रक्रीयेत औद्योगिक क्षेत्रातील आस्थापनांचा सक्रीय सहभाग आवश्यक असून, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत औद्योगिक आस्थापना/समुह यांना प्रथम प्राधान्य देण्यांत येणार आहे. त्यामुळे औद्योगिक आस्थापनांना त्यांच्या मागणीनुसार आवश्यक कुशल मनुष्यबळाची निर्मिती विहित कालावधीत करून "वापरण्यासाठी सुसज्ज" दर्जेदार कुशल मनुष्यबळ तयार करता येईल जेणेकरून इच्छुक उमेदवारांना आवश्यक कौशल्य प्राप्त होवून रोजगार प्राप्त करता येण्याबरोबरच औद्योगिक आस्थापनांना योग्य कुशल मनुष्यबळ प्राप्त होवून औद्योगिक विकास साधला जाणार आहे. सदर वस्तूस्थिती लक्षात घेता, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत " उद्योगकेंद्रीत कौशल्य विकास कार्यकमास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**उद्योगकेंद्रीत कौशल्य विकास कार्यक्रमाच्या विस्तृत कार्यपद्धती खालील प्रमाणे राहील.**

**१. औद्योगिक आस्थापना/समुह यांचे कडे उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा व कुशल प्रशिक्षक यांचा वापर करून प्रशिक्षण देणे.**

संबधित औद्योगिक आस्थापना/समुह अथवा परिसरातील विविध औद्योगिक आस्थापनांना आवश्यक असलेले विशिष्ट कुशल मनुष्यबळाची निर्मित करण्याकरीता संबंधित आस्थापनेने तयार केलेले Tailor Made/विशिष्ट कौशल्याची मागणी असलेले अभ्यासक्रम राबवून कुशल मनुष्यबळाची निर्मिती करण्यांत येईल. त्याकरीता आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा उदा. जागा, इमारत, अद्ययावत यंत्रसामग्री/साधनसामग्री इत्यादीं तसेच त्याची दुरूस्ती व देखभाल या बाबींकरीता स्वतंत्र प्रशिक्षण सुविधा निर्माण न करता संबंधित औद्योगिक आस्थापनेकडे उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा व यंत्रसामग्री/साधनसामग्री चा ( Industrial Set up ) वापर औद्योगिक आस्थापनांच्या सोईनुसार प्रशिक्षणासाठी करण्यांत येईल. त्याच प्रमाणे सदर प्रशिक्षणाकरीता लागणारे प्रक्षिशित व तज्ञ प्रशिक्षक संबंधित औद्योगिक आस्थापना/समुहांमार्फतच पुरविण्यांत येतील. अभ्यासक्रमांमध्ये प्रात्यक्षिक,सैधांतिक़ Soft/life skill यांचा समावेश असेल, सदर अभ्यासक्रम संपुर्णपणे औद्योगिक आस्थापनांच्या/समुहांच्या मनुष्यबळाच्या मदतीने त्यांच्याच पायाभूत सुविधांचा वापर करून राबविण्यांत येतील. प्रशिक्षणाकरीता सदर औद्योगिक आस्थापनेत अथवा त्यांच्याशी संबंधित इतर औद्योगिक आस्थापनेमध्ये प्रशिक्षणार्थ्यांकरीता आवश्यकतेनुसार ऑन दि जॉब प्रशिक्षणाची सुविधा पुरवतील. त्याच प्रमाणे यशस्वीपणे प्रशिक्षण पुर्ण केलेल्या उमेदवारांना औद्योगिक आस्थापनेची मागणी असल्यामुळे रोजगार उपलब्ध होणार आहे.

प्रशिक्षणाकरीता लागणाऱ्या पायाभूत सुविधा, मनुष्यबळ, कच्चा माल इतर अनुषांगिक बाबींवरील आवर्ती व अनावर्ती खर्च हा संबंधित आस्थापनेमार्फत करण्यांत येणार असून, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५ अन्वये विहित केलेल्या किंवा शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेल्या दराने प्रशिक्षण व इतर अनुषांगिक बाबींवरील खर्चाची प्रतिपुर्ती करण्यांत येईल.

सदर प्रशिक्षण कार्यक्रम हा औद्योगिक आस्थापना व मान्यता प्राप्त प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त सहभागानेही राबविण्यांत येईल. यामध्ये अभ्यासक्रमांतील सैद्धांतिक/सॉफ्ट स्किल/लाईफ स्किल चे प्रशिक्षण मान्यता प्राप्त प्रशिक्षण संस्थां मार्फत देण्यांत येईल. तसेच प्रात्यक्षिकांकरीता औद्योगिक आस्थापनांमधील पायाभूत सुविधांचा व प्रशिक्षणासाठी तज्ञ प्रशिक्षकांचा वापर करण्यांत येईल. त्याकरीता संबंधित औद्योगिक आस्थापना त्यांचे स्तरावर मान्यता प्राप्त प्रशिक्षण संस्थेसमावेत सामंजस्य करार ( MoU) करू शकतील.

२. **औद्योगिक आस्थापना/समुह यांचे पात्रतेचे निकष** :-

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था यांचेकडे सूचिबध्द झालेल्या औद्योगिक आस्थापना/समुह यांनी खालील निकष पुर्ण केले असल्यास अशा औद्योगिक आस्थापना/समुह यांना उद्योगकेंद्रीत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यांस मान्यता देण्यांत येईल.

" औद्योगिक आस्थापनांनी शिकाऊ उमेदवारी कायदा, १९६१ अंतर्गत (औद्योगिक समुहांच्या संदर्भात मधील किमान एका औद्योगिक आस्थापनेची) नोंदणी केली असणे आणि औद्योगिक आस्थापनां अथवा त्यांच्या उप आस्थापनांतील (समुहां संदर्भात समुहांतील सर्व आस्थापना) एकूण कर्मचारी संख्या किमान १०० इतकी असणे बंधनकारक राहील."

३. **अभ्यासक्रम** :- उदयोगकेंद्रीत कौशल्य विकास केंद्रामध्ये खालील अभ्यासक्रम राबविण्यांत येतील.

१. राज्य/केंद्र शासनाच्या विभागांनी/मान्यता प्राप्त मंडळ/विद्यापीठ इत्यादीं यांनी मान्यता दिलेल्या संस्थांनी मान्यता दिलेले अभ्यासक्रम (उदा. SSCs, NSDC, MSSDS इत्यांदींनी मान्यता दिलेले अभ्यासक्रम)

२. औद्योगिक आस्थापना /समुह यांनी विशिष्ट गरजेसाठी तयार केलेले (Tailor Made/Need Based) अभ्यासक्रम. विशिष्ट गरजेसाठी तयार केलेल्या (Tailor Made/Need Based) अभ्यासक्रमांस महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

४. **प्रवेश पध्दती, प्रवेश क्षमता, प्रवेशाकरीता किमान शैक्षणिक पात्रता, प्रशिक्षकांची किमान शैक्षणिक अर्हता इत्यादीं :-**

४.१. अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रीया प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियानांतर्गत शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५ अन्वये विहित केलेल्या अथवा शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेल्या प्रक्रीयेनुसार राबविण्यांत येईल. मात्र व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रामार्फत उमेदवार प्राप्त न झाल्यास औद्योगिक आस्थापना/समुह उमेदवारांचे Mobilization करून कौशल्य पूर्व चाचणीद्वारे उमेदवारांना अभ्यासक्रमास प्रवेश देवू शकतील.

४.२. राज्य/केंद्र शासनाच्या विभागांनी/मान्यता प्राप्त मंडळ/विद्यापीठ इत्यादीं यांनी मान्यता दिलेल्या संस्थांनी मान्यता दिलेले अभ्यासक्रम (उदा. SSCs, NSDC, MSSDS इत्यांदींनी मान्यता दिलेले अभ्यासक्रम) राबविल्यास, अभ्यासक्रमाच्या तुकडीची प्रवेश क्षमता, प्रवेशासाठी किमान शैक्षणिक पात्रता, प्रशिक्षकांची शैक्षणिक अर्हता इत्यादीं बाबीं संबंधित विभाग/प्राधिकरण/संस्था यांनी निश्चित केल्या प्रमाणे राहील. तसेच औद्योगिक आस्थापना /समुह यांनी विशिष्ट गरजेसाठी तयार केलेल्या (Tailor Made/Need Base) अभ्यासक्रमांच्या तुकडीची प्रवेश क्षमता, प्रवेशासाठी किमान शैक्षणिक पात्रता, प्रशिक्षकांची शैक्षणिक अर्हता इत्यादीं बाबीं संबंधित औद्योगिक आस्थापना/समुह (प्रशिक्षण संस्थेचा सहभाग असल्यास, संयुक्तपणे) यांना महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेच्या मान्यतेने निश्चित करण्याचे अधिकार रहातील.

५. **मुल्यमापन व प्रमाणकीकरण** :-

५.१. राज्य/केंद्र शासनाच्या विभागांनी/मान्यता प्राप्त मंडळ/विद्यापीठ इत्यादीं यांनी मान्यता दिलेल्या संस्थांनी मान्यता दिलेले अभ्यासक्रम (उदा. SSC॰s, NSDC, MSSDS इत्यांदींनी मान्यता दिलेले अभ्यासक्रम) राबविल्यास संबंधित विभाग/प्राधिकरण/संस्था यांनी विहित केलेल्या मुल्यमापन संस्थेकडून (Assessing Bodies) प्रशिक्षणार्थ्यांच्या कौशल्याचे मुल्यमापन करण्यांत येवून, प्रशिक्षणार्थ्यांना संबंधित औद्योगिक आस्थापना/समुह (प्रशिक्षण संस्थेचा सहभाग असल्यास, संयुक्तपणे) व उक्त विभाग/प्राधिकरण/संस्था यांचे संयुक्त प्रमाणपत्र देण्यांत येईल.

५.२. औद्योगिक आस्थापना /समुह यांनी विशिष्ट गरजेसाठी तयार केलेल्या (Tailor Made/Need Base) अभ्यासक्रमांच्या संदर्भांत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था यांनी विहित केलेल्या मुल्यमापन संस्थेकडून (Assessing Bodies) प्रशिक्षणार्थ्यांच्या कौशल्याचे मुल्यमापन करण्यांत येवून, प्रशिक्षणार्थ्यांना संबंधित

औद्योगिक आस्थापना/समुह (प्रशिक्षण संस्थेचा सहभाग असल्यास, संयुक्तपणे) व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था यांचे संयुक्त प्रमाणपत्र देण्यांत येईल.

६. **उद्योगकेंद्रीत कौशल्य प्रशिक्षणासाठी खर्चाची प्रतिपुर्ती :-**

उद्योगकेंद्रीत कौशल्य विकास कार्यक्रमासाठी राज्य शासनाकडून प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५ अन्वये विहित केलेल्या अथवा शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या दरानुसार प्रशिक्षण व अनुषांगिक खर्चाची प्रतिपुर्ती खालील टप्यानुसार करण्यांत येईल.

६.१. १०% रक्कम प्रशिक्षण सुरू झाल्यावर (अभ्यासक्रमाच्या पहिल्या दिवशीच्या बायोमेट्रिक हजेरी प्रणालीच्या आधारे)

६.२. खर्चाची ५०% रक्कम अभ्यासक्रम/प्रशिक्षण संपल्यावर (Biometric हजेरी प्रणालीत उपस्थितीच्या अधारे मुल्यमापन व प्रमाणिकरणाच्या आधारे), खर्चाची ३०% रक्कम, यशस्वी झालेल्या उमेदवारांपैकी किमान ७५% उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार मिळाल्यानंतर (नोकरी लागल्यापासून/स्वयंरोजगार मिळून तीन महिन्यानंतर विहित कागदपत्रे/पुरावे सादर केल्यावर)

६.३. उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार ६ महिन्यापर्यंत उपलब्ध झाल्याबाबतचे विहित कागदपत्रे/पुरावे सादर केल्यावर आणि त्यांचे मुल्यमापन फॉर्म ऑनलाईन प्राप्त झाल्यावर उर्वरीत १० % रक्कम अदा करण्यात येईल.

**किंवा,**

संबंधित उद्योग केंद्राने विनंती केल्यास उद्योगकेंद्रीत प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षित उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार ०६ महिन्यापर्यंत उपलब्ध झाल्याबाबतचे विहित कागदपत्रे/पुरावे मुल्यमापन फॉर्मसह ऑनलाईन प्राप्त झाल्यावर एकदाच १००% रक्कम अदा करण्यात येईल. तथापी, स्वयंसहाय्यित तत्वावर राबविण्यांत येणाऱ्या उद्योगकेंद्रीत अभ्यासक्रमांसाठी औद्योगिक आस्थापना/प्रशिक्षण केंद्र, प्रशिक्षणार्थी, मुल्यमापन संस्था इत्यादींना कोणत्याही प्रकारची प्रतिपुर्ती रक्कम शासनाकडून देय राहणार नाही.

७. **औद्योगिक आस्थापना/समुहांचा सहभाग, कर्तव्य व जबाबदाऱ्या.**

७.१. योजनेच्या प्रचार व प्रसाराकरीता विशेष मोहिम राबविणे.

७.२. उदयोगकेंद्रीत कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थे समवेत लवचिक सामंजस्य करार करणे.

७.३. अभ्यासक्रम व त्याची मानके निश्चित करणे. सदर अभ्यासक्रम शक्यतो NSQF सुसंगत असावेत.

७.४. प्रशिक्षणाकरीता आवश्यक असलेली जागा, इमारत, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री, कच्चा माल, आवश्यक आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी बाबी औद्योगिक आस्थापना/समुह यांनी आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देणे.

७.५. संबंधित क्षेत्रातील अर्हताधारक अथवा अनुभव असलेले तज्ञ प्रशिक्षकांच्या सेवा प्रशिक्षण कार्यक्रमांकरीता उपलब्ध करून देणे.

७.६. प्रशिक्षणार्थ्यांनी प्राप्त केलेल्या कौशल्याचे संयुक्तपणे मुल्यांकन व प्रमाणकीकरण करणे.- प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे मुल्यमापन संबंधित औद्योगिक आस्थापना व आवश्यक तेथे मान्यता प्राप्त मुल्यमापन संस्था (Assessing Bodies) अथवा संयुक्तपणे करण्यांत येईल व यशस्वी उमेदवारांना संबंधित औद्योगिक आस्थापना आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था अथवा ज्या विभाग/संस्था/प्राधिकरण/इत्यादी यांनी मान्यता दिलेले अभ्यासक्रम असल्यास, त्या विभाग/संस्था/प्राधिकरण/इत्यादी यांचे संयुक्त प्रमाणपत्र देणे.

७.७. प्रशिक्षण देण्यांत आलेल्या प्रशिक्षणार्थ्यांपैकी ७५% प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या औद्योगिक आस्थापनेत/समुहांमध्ये अथवा त्यांच्या उप औद्योगिक आस्थापनांमध्ये किमान ०१ वर्षाकरीता कायदयाने विहित केलेले किमान वेतन किंवा प्रशिक्षण खर्चाच्या ५० % यापैकी जे जास्त असेल, इतक्या वेतनावर रोजगार उपलब्ध करून देणे.

७.८. प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणास अनुसरून किमान १५ दिवस On Job Training ची सुविधा उपलब्ध करून देणे.

७.९. औद्योगिक आस्थापना त्यांच्या प्रशिक्षण सुविधांचा वापर करून, शासनाने प्रतिपुर्ती करावयाच्या प्रशिक्षण योजनां व्यतिरिक्त स्वंसहाय्यित अभ्यासक्रम राबवू शकतील.

७.१०. प्रवेश, प्रशिक्षणार्थ्यांची नोंदणी, मुल्यांकन व प्रमाणकीकरण, रोजगाराची माहिती महाकौशल्य पोर्टल अथवा शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या पध्दतीनुसार उपलब्ध करून देणे.

**८. राज्य शासनाचा सहभाग, कर्तव्य व जबाबदाऱ्या :-**

राज्य शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था ही नोडल एजन्सी म्हणून विहित केलेली असून, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेमार्फत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

८.१. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियानांतर्गत शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५ अन्वये तसेच शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेल्या दराने प्रशिक्षण व अनुषांगिक बाबींवरील खर्चाची प्रतिपुर्ती करणे.

८.२. उद्योगकेंद्रीत कौशल्य विकास केंद्र स्थापित करू इच्छिणाऱ्या औद्योगिक आस्थापना/उद्योगगसमुह यांचेकडून इरादापत्र मागवून, प्रशिक्षण सुविधा उपलब्धतेच्या खात्रीअंती केंद्र स्थापन करण्यांस मान्यता देवून सुचिबध्द करणे. तसेच उद्योगकेंद्रीत कौशल्य कार्यक्रम राबविण्यासाठी सुचिबध्द करण्यांत आलेल्या औद्योगिक आस्थापना/समुह यांचेशी लवचिक सामंजस्य करार करणे. लवचिक सामंजस्य करार करताना वार्षिक नियोजन, निर्धारीत लक्ष्य यांचा विचार करून, सामंजस्य करारामध्ये अभ्यासक्रमांचा कालावधी, तुकडयांची संख्या , प्रवेश क्षमता इत्यादीं बाबीं नमूद करणे.

८.३. आवश्यकतेनुसार औद्योगिक आस्थापना/समुह यांनी तयार केलेल्या अभ्यासक्रमांस (Tailor Made/Need Based) मान्यता देणे.

८.४. Tailor Made/Need Based अभ्यासक्रमां संबंधात प्रशिक्षणार्थ्यांनी प्राप्त केलेल्या कौशल्याचे औद्योगिक आस्थापना/समुह यांच्या संयुक्त विद्यमानाने मुल्यांकन व प्रमाणकीकरण करणे.

८.५. औद्योगिक आस्थापना/समुहांनी प्रशिक्षणार्थ्यांची नोंदणी महाकौशल्य पोर्टल अथवा शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या पध्दतीनुसार केल्याबाबत खातरजमा करून, रोजगारासंदर्भात ०६ महिन्यापर्यंत पाठपुरावा करणे तसेच दर तीन वर्षांनी योजनेचे/केंद्रांचे पुनर्मुल्यांकन करणे.

उपरोक्त शासन निर्णय मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली गठींत करण्यांत आलेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या बैठकीचे अनुषंगाने मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११२१६०१५१९९०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santokh Singh Sandhu

Digitally signed by Santokh Singh Sandhu
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Santokh Singh Sandhu
Date: 2016.01.12 16:03:36 +05'30'

**( एस. एस. संधू )**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई,

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. सर्व मा.मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. सर्व विधान परिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ,
७. मा.मुख्य सचिव, मंत्रालय , मुंबई,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
१०. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद ), मुंबई,
११. आयुक्त, कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, कफ परेड, मुंबई,
१३. आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई,
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१६. महालेखापाल (लेखा परीक्षा) -१, महाराष्ट्र, मुंबई,
१७. महालेखापाल (लेखा परिक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर,
१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१९. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२०. सर्व विभागीय आयुक्त,
२१. सर्व जिल्हाधिकारी,
२२. आयुक्त सर्व महानगरपालिका,
२३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२४. मुख्याधिकारी, सर्व नगर परिषद/नगर पंचायती,
२५. संचालक (प्रशिक्षण/व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
२६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/ अमरावती/औरंगाबाद/ नाशिक,
२७. उपसंचालक, विभागीय मुख्यालय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/पुणे/नागपूर/ अमरावती/औरंगाबाद /नाशिक,
२८. सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई,
२९. निवड नस्ती.